
# कोल्हापूर परिक्षेत्र

# मा. मुख्यमंत्री
# १०० दिवसांचा  कृती आराखडा -
# क्षेत्रीय कार्यालय सुधारणा सादरीकरण

# संकेतस्थळ

या कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ तयार आहे व वापरण्याकरीता सुलभ आहे. परिक्षेत्रातील आवश्यक माहिती प्रदर्शित केली आहे. अधिकृत सिक्युरिटी ऑडीट करण्यात आले.



# सुकर जीवनमान

## किमती मुद्देमाल फिर्यादीस परत (जानेवारी २०२५ ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत)

| अ. नं. | घटक | सर्व प्रकारची मोटार वाहने | | दागिने | | इतर मुद्देमाल | | एकूण किंमत (Rs ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मोटार वाहने | किंमत (Rs ) | दागिने | किंमत (Rs ) | मुद्देमाल | किंमत (Rs ) | ( ४+६+८) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | कोल्हापूर | 346 | 36832000 | 76 | 13900780 | 178 | 3954478 | 54687258 |
| 2. | सांगली | 322 | 32057505 | 58 | 8002950 | 36 | 2768950 | 42829405 |
| 3. | सातारा | 200 | 35158904 | 43 | 9617989 | 60 | 2422826 | 47199719 |
| 4. | सोलापूर ग्रा. | 157 | 30553400 | 92 | 8583724 | 18 | 1024740 | 40161864 |
| 5. | पुणे ग्रा. | 950 | 45483934 | 415 | 9333506 | 1436 | 5321908 | 60139348 |
| | एकूण | 1975 | 180085743 | 684 | 49438949 | 1728 | 15492902 | 245017594 |

## न्यायालयाच्या आदेशानुसार मुद्देमालाची विल्हेवाट लावणे/प्रकरणांची संख्या (जानेवारी २०२५ ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत)

| अ. नं. | घटक | मुद्देमाल निर्गती |
|---|---|---|
| 1. | कोल्हापूर | 1691 |
| 2. | सांगली | 1718 |
| 3. | सातारा | 203 |
| 4. | सोलापूर ग्रा. | 4164 |
| 5. | पुणे ग्रा. | 3316 |
| | एकूण | 11092 |

# जनतेच्या तक्रारींचे निवारण

**" आपले सरकार पोर्टल"**


**" पी. जी. पोर्टल "**

**" विभागीय लोकशाही दिन " मध्ये १५.०४.२०२५ रोजी अर्ज प्रलंबीत नाहीत. सर्व निर्गती केली.**

**सर्व पाच घटकामध्ये दर शनिवारी तक्रार निवारण दिन राबविण्यात येतो.**

**जानेवारी २०२५ ते १५.०४.२०२५ अखेर परिक्षेत्रात ७३ तक्रार निवारण दिन घेवून १२२३५ तक्रारींचे निराकरण करण्यात आले.**



# कार्यालयीन कामकाज व तक्रार निवारण कामकाजाचे मुल्यमापन


| पासपोर्ट व चारित्र्य पडताळणी | | | |
|---|---|---|---|
| शिर्षक | सन 2025 (माहे 15 एप्रिल 2025 अखेर) | | |
| | दाखल | निर्गत | % |
| पासपोर्ट | 31897 | 29835 | 94 |
| चारित्र्य | 40992 | 38307 | 93 |
| पारपत्र व चारित्र्य पडताळणी अर्ज विहीत वेळेत निर्गत होणेबाबत घटकांकडे पाठपुरावा | | | |

**नागरीकांना शासकीय लोकसेवा तत्परतेने पुरविण्यात येवुन, जीवन सुकर व सुलभ करुन सेवेबदल आश्वस्त केले.**

# जनतेच्या तक्रारींचे निवारण

**अभ्यागतांच्या भेटीसाठी दैनंदिन वेळ देण्यात आलेली आहे. ०५ घटकातील दौऱ्या दरम्यान नागरीकांना भेटी बाबत आगावू माहिती कळवून भेटी घेण्यात येतात.**



प्रेस नोट क्र.२४ /२०२५,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली.
दिनांक- १९/०२/२०२५.

प्रेस नोट

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर यांचा सांगली दौरा.

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर श्री. सुनिल फुलारी सर हे दि. २०/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२५ चे दरम्यान सांगली पोलीस दलाचे वार्षिक निरीक्षण/तपासणी करणार आहेत.

| दिनांक | भेटीचे ठिकाण |
|---|---|
| दि. २०/२/२०२५ | उपविभागीय पोलीस अधिकारी, सांगली विभाग सांगली. |
| | महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज. |
| दि. २१/०२/२०२५ | उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगाव विभाग, तासगाव. |
| | तासगाव पोलीस ठाणे |
| दि. २२/०२/२०२५ | कवठेमहांकाळ पोलीस ठाणे |
| | आटपाडी पोलीस ठाणे |
| दि. २४/०२/२०२५ | पोलीस मुख्यालय, विश्रामबाग, सांगली |
| दि. २५/०२/२०२५ | पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली |
| | वाहतुक शाखा, मिरज शहर |
| | वाहतुक शाखा, सांगली शहर |

नागरिकांना मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर यांना भेटावयाचे असल्यास वर नमुद ठिकाणी नागरिकांच्या भेटीसाठी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर हे उपलब्ध राहणार आहेत.

तरी ज्या नागरिकांना मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर यांना भेटावयाचे असल्यास त्यांनी वर नमुद संबधित पोलीस ठाणे अगर उपविभागीय कार्यालय येथे आपली नावे अगोदर कळवावीत जेणेकरुन त्याप्रमाणे नागरिकांना मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर यांचेशी भेटीची वेळ व ठिकाण नागरिकांना कळविण्यात येईल.

( सतिश शिंदे )
पोलीस निरीक्षक,
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली.



# सुकर जीवनमान




**- ड्रगमुक्त समाज -**

सांगली घटका मध्ये एमडी ड्रग बनवणारा कारखान्यावर छापा कारवाई २९ कोटीचे ड्रग जप्त. मॅफेनटर्माईन सल्फेट इंजेक्शन बॉटल १५०७ कि. रु.१४,४६,०००/- रकमेचा मुद्देमाल जप्त, जानेवारी २०२५ ते १५ एप्रिल २०२५ कालावधीत परिक्षेत्रात अवैध गुटखा विरोधात ३३ गुन्हे दाखल करुन ३.४४ कोटी रु. मुद्देमाल जप्त, गांजा विक्री व बाळगणे बाबत ६१ गुन्हे दाखल करण्यात आले असुन, यामध्ये १.२१ कोटी रु. किंमतीचा ६०३ किलो गांजा जप्त

**- नागरीक मदत -**

दरोडा, चोरी, चेन स्नॅचिंग, मोबाईल चोरी या गंभीर गुन्हयांच्या उकलीकरिता पाठपुरावा व उघड झालेल्या गुन्हयातील मुद्देमाल फिर्यादीस परत करण्यात आला. हे कार्य सतत चालू आहे.



# सुकर जीवनमान- स्त्रीया विरुध्दचे गुन्हे पर्यवेक्षण



**बलात्कार**

सन २०२४ - ११६

सन २०२५ - ९९

(घट आहे)

**विनयभंग**

सन २०२४ - ५०१

सन २०२५ - ४९८

(घट आहे)

**POCSO**

सन २०२४ - ३७०

सन २०२५ - ३६५

(घट आहे)

निर्भया पथक, डायल ११२ यांच्या प्रभावी कामगिरीमुळे विनयभंग व POCSO कायद्यान्वये दाखल गुन्हयामध्ये घट झालेली आहे.

महिलांविषयी सुरक्षीत वातावरण निर्माण केल्याने महिलांचे जीवन सुकर व सुरक्षीत झाले आहे

नमुद आकडेवारी ०१.०१.२०२५ ते १५.०४.२०२५ या कालावधीतील असून २०२४ मधील तत्सम कालावधीमधील तुलना घेण्यात आलेली आहे.

# स्वच्छता





सर्व अभिलेखांचे वर्गीकरण करणेत आले. मुदत बाहय अभिलेख नष्ट करण्यात आले. निंदणीकरण, नष्टीकरण व निर्लेखन मोहिम अंतर्गत ३१ क्विंटल अभिलेख नाश करण्यात आला. जड वस्तु संग्रह नोंदवही अद्ययावतीकरण करण्यात आले. जुन्या व निरुपयोगी जड वस्तुची विल्हेवाट लावण्यात आली. कार्यालयाची रंगरंगोटी करण्यात आलेली आहे.





# कार्यालयातील सोयी सुविधा

अभ्यागतांसाठी सुसज्ज स्वच्छ प्रतिक्षालय व बसण्याकरीता पुरेशी आसन व्यवस्था आहे. सौजन्यपुर्ण विचारपुस करुन पाणी व चहापान देण्यात येते.

कर्मचारी व येणारे सर्व अभ्यागत यांचेकरीता स्वच्छ जलपान व्यवस्था आहे.

पुरुष व महिला प्रसाधनगृहे स्वतंत्र व स्वच्छ आहेत. गर्भवती / महिला यांच्याकरिता स्वतंत्र विश्रांती गृहाची व्यवस्था आहे.









# कार्यालयातील सोयी सुविधा













सर्व कार्यालयीन शाखांचे, पार्किंग, जल, अधिकारी कार्यकाल, कार्यालयाचे माहितीचे फलक प्रदर्शित आहेत.

अंमलदार व लिपीक यांचेसाठी कार्यासन व फर्निचर तयार करण्यात आले. दर्शनी बाजुस बाग आहे. बागेचे पुनरुज्जीवन केले. रात्रीच्या वेळेस पुरेशी प्रकाश व्यवस्था आहे. अभिलेखागार आहे.

# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी



घटक जिल्हयांना व पोलीस ठाणेंना नियमित व अचानक भेटी देवुन गंभीर गुन्हयांचा आढावा व कामकाजाचे मुल्यांकन केले. संबंधीत अधिकारी व सर्व प्रशिक्षणार्थी अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले.





# क्षेत्रीय कार्यालयांना भेटी



कोल्हापूर घटकातील वार्षिक निरीक्षण सन २०२४-२०२५ दरम्यान पोलीस अधीक्षक कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस ठाण्यांना भेटी देवून सातसुत्री कार्यक्रमांची अंमलबजावणी करुन घेण्यात आली. सोलापूर जिल्हयातील शासकीय रुग्णालय येथे भेट व रुग्णालयाचे अधिष्ठाता व वैदयकीय अधीक्षक यांचे सोबत जनतेस मदत व आरोग्य सुविधांबाबत चर्चा केली.



# उद्योग व गुंतवणुकीस प्रोत्साहन

पंचतारांकित / औदयोगिक वसाहत उद्योजकांची बैठक घेतली. स्थानिक पातळीवर उपद्रव होत असल्यास त्वरित तक्रार करणे व कायदेशीर कारवाई करणेसाठी सर्व अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहेत. आर्थिक फसवणुकी व कायदेशीर तरतुदीबाबत जनजागृती. जानेवारी २०२५ ते १५.०४.२०२५ पर्यंत उद्योजकांच्या ०४ बैठक घेवून उद्योजकांना आश्वस्त करण्यात आले. परिक्षेत्रात उद्योजकांच्यासाठी कायदा व सुव्यवस्था परिस्थिती सामान्य ठेवुन उदयोग वाढीस पोषक वातावरण तयार केले.






# प्रशिक्षण



दिनांक २७/०३/२०२५ रोजी सीपीआर, पुणे येथे परिक्षेत्रीय स्तरावरील मानवी हक्कांचे संरक्षण व प्रभावी अंमलबजावणी या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन. राज्य मानवी हक्क आयोगाचे माजी अध्यक्ष श्री. सय्यद मार्गदर्शक. कार्यशाळेमध्ये १०९ अधिकारी यांची उपस्थिती.



दिनांक ०९/०४/२०२५ रोजी सिंम्बॉयसिस इंटरनॅशनल कॉलेज, पुणे येथे परिक्षेत्रीय स्तरावरील Latest Trends in AI & Cyber Security या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन. कार्यशाळेस सिंम्बॉयसिस इंटरनॅशनल कॉलेजचे कुलगुरु डॉ. रामकृष्णन रमण मार्गदर्शक कार्यशाळेमध्ये एकूण ९३ अधिकारी अंमलदार यांची उपस्थिती. दि. ०४.०४.२०२५ रोजी कोल्हापूर येथे AI प्रशिक्षण वर्ग आयोजन, लिपीक वर्ग प्रशिक्षणासाठी निर्देशन.

# नविन कायद्याचे प्रशिक्षण  प्रसार व प्रसिध्दी

| अ. न. | घटकाचे नाव | घटकातील पो.अधिकारी यांची संख्या व प्रशिक्षीत अधिकारी संख्या | | घटकातील पो. अंमलदार यांची प्रत्यक्ष संख्या व प्रशिक्षीत अंमलदार संख्या | | % |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अधिकारी संख्या | प्रशिक्षित संख्या | अंमलदार संख्या | अंमलदार संख्या | |
| १ | कोल्हापूर | 159 | 159 | 2746 | 2746 | 100 |
| २ | सांगली | 160 | 160 | 2702 | 2702 | 100 |
| ३ | सातारा | 154 | 154 | 2775 | 2775 | 100 |
| ४ | सोलापूर ग्रा. | 139 | 139 | 2335 | 2335 | 100 |
| ५ | पुणे ग्रामीण | 226 | 226 | 3045 | 3045 | 100 |
| एकूण | | 838 | 838 | 13603 | 13603 | 100 |

# नविन कायद्याबाबत जनतेत प्रसार व प्रसिध्दी

दिनांक ०१.०७.२०२४ रोजी पासून नव्याने लागू झालेले ०३ नविन फौजदारी कायद्याबाबत जनजागृती करणेकरीता जिल्हा, उपविभाग व पोलीस ठाणे विविध स्तरावर जनजागृती, बैठका, आयोजीत करण्यात आल्या. परिक्षेत्रातील ०५ घटकामध्ये जनजागृती मोहिम राबविण्यात आली. परिक्षेत्रामध्ये एकूण ६८६ बैठका घेवुन जनजागृती करण्यात आली. दि. १०.०४.२०२५ रोजी सांगली येथे डिजीटल मिडीया राज्य अधिवेशनामध्ये नविन कायद्यांबाबत पत्रकारांचे प्रबोधन केले
















# नाविण्यपुर्ण उपक्रम

महाराष्ट्र शासन

सुनिल व.फुलारी (भा.पो.से.)
विशेष पोलीस महानिरीक्षक

विशेष पोलीस महानिरीक्षक /E-1619059
कोल्हापूर परिक्षेत्र,
कोल्हापूर यांचे कार्यालय
☎ : (०२३१) २६५६५६८
: ig.kolhapurrange@mahapolice.gov.in
दिनांक :- 12 DEC 2024

प्रिय महेंद्र,

सस्नेह,

दि.०३/१२/२०२४ रोजी परिक्षेत्रातील घटक जिल्हयांचे पोलीस अधीक्षक यांची गुन्हे आढावा बैठक घेतली. बैठकीत जिल्हानिहाय प्रलंबित प्रकरणाचा व्यक्तीशः आढावा घेण्यात आला.

१) प्रलंबीत गुन्हे, २) मुद्देमाल निर्गती, ३) दोषसिध्दी प्रमाण, ४) अर्ज निर्गती, ५) प्राथमिक, विभागीय चौकशी या मुद्दयांवर ७५% निर्गतीचे ध्येय आगामी १५ डिसेंबर २०२४ ते १५ मार्च २०२५ या कालावधीत निश्चित करावे.

वरील मुद्दयांचे निर्गतीकरीता दिनांक २८.०२.२०२५ अखेर खालील प्रमाणे लक्ष्य (Target) निश्चित करण्यात येत आहे. त्याप्रमाणे कारवाईची आकडेवारी खालील तक्त्यात नियत वेळेवर सादर करावी.

**१) एकूण IPC/BNS गुन्हे उघडकीचे प्रमाण**

| अ.क्र. | जिल्हा | सन २०२४ (३१.१०. अखेर) | सन २०२५ (२८.०२ अखेर) |
|---|---|---|---|
| | | उघडकीची टक्केवारी | उघडकीच्या टक्केवारीत वाढ |
| १) | कोल्हापूर | ७८% | ९०% |

**२) पोलीस तपासावर प्रलंबीत एकूण IPC/BNS व एकूण SLL गुन्हे कमी करण्यात यावे.**

| अ.क्र. | जिल्हा | सन २०२४ (३१.१०. अखेर) | | सन २०२५ (२८.०२. अखेर) | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण तपास प्रलंबीत गुन्हे संख्या | | एकूण तपास प्रलंबीत गुन्हे संख्या ५०% ने कमी | |
| | | एकूण IPC/BNS | एकूण SLL | एकूण IPC/BNS | एकूण SLL |
| १) | कोल्हापूर | ३२२० | १४०१ | १६१० | ७०० |

**३) भाग ६ व एकूण SLL मधील शिर्षकाखालील कारवाईत वाढ करणे.**

| अ.क्र. | जिल्हा | सन २०२४ (३१.१०. अखेर) | सन २०२५ (२८.०२. अखेर) |
|---|---|---|---|
| | | एकूण कारवाईची संख्या | एकूण कारवाईची संख्या |
| १) | कोल्हापूर | ६४६४ | ५०% वाढवावी. |

**४) मुद्देमाल निर्गती**

| अ.क्र. | जिल्हा | सन २०२४ (३१.१०. अखेर) | | सन २०२५ (२८.०२. अखेर) | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकूण प्रलंबीत मुद्देमाल संख्या | | एकूण प्रलंबीत मुद्देमाल संख्या ५०% कमी | |
| | | एकूण IPC/BNS | एकूण SLL | एकूण IPC/BNS | एकूण SLL |
| १) | कोल्हापूर | १७८३१ | ७४७७ | ८९१६ | ३७३९ |

CS Scanned with CamScanner

**परिक्षेत्रातील सर्व घटकांना निर्गतीबाबत ध्येयनिश्चिती देण्यात आलेली होती व यासाठी घटकांकडे पाठपुरावा करण्यात आला.**

**परिणामी परिक्षेत्रात भादंवि /भान्यासं अंतर्गत दाखल गुन्हे उघडकीची टक्केवारी ८१ टक्के, भादवि/भान्यासं अंतर्गत गुन्हे निर्गतीचे प्रमाण ७८ टक्के आहे.**


# नाविण्यपुर्ण उपक्रम-अपघात मुक्त वारी

पंढरपूर येथे आषाढी, कार्तिकी, चैत्र व माघवारी दरम्यान महाराष्ट्रातून व महाराष्ट्राबाहेरून लाखो भाविक श्री विठ्ठल - रुक्मीणी दर्शनासाठी येतात. दिंडी मार्गक्रमण करणा-या प्रत्येक महामार्गवर वारी कालावधीमध्ये वाहतूकीचे नियमन व नियंत्रण, वाहतूक मार्गात केलेले बदल यामुळे २०२३, २०२४ व २०२५ या कालावधीत पंढरपूर सर्व वारी अपघात मुक्त पार पडली. सन २०२५ चैत्रवारी यात्रा पंढरपूर येथील गर्दीचे नियमन व नियंत्रणाकरीता ए.आय. तंत्रज्ञानचा वापर केलेला आहे.

चैत्र यात्रा २०२५ श्री क्षेत्र जोतिबा येथे गर्दी व वाहतुकीचे नियमन व नियंत्रण करिता कृत्रिम बुध्दीमत्ता आधारीत ड्रोन्सचा वापर करण्यात आला. यशस्वी नियोजन.





# नाविण्यपुर्ण उपक्रम

- लोकसभा व विधानसभा निवडणूक २०२४ कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त हाताळण्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणा-या महिला पोलीस पाटलांचा जिल्हा वार्षिक निरीक्षण २०२५ दरम्यान सत्कार
- गणेश मंडळांना " एक गाव एक गणपती " संकल्पना राबविणेबाबत प्रोत्साहित करून सन २०२४ मध्ये एकूण १४४१ या ठिकाणी " एक गांव एक गणपती " संकल्पना प्रत्यक्ष राबण्यात आली.
- MSPG व MSPDM स्पर्धेकरीता निवड झालेल्या खेळाडूंना शास्त्रशुध्द खेळाचे प्रशिक्षण, प्राविण्यप्राप्त खेळाडूकडून मार्गदर्शन व प्रेरणा, सकस आहार यामुळे MSPG - २०२४ व २०२५ मध्ये प्राप्त गुणांची तुलना करता सन २०२५ मध्ये परिक्षेत्रीय संघाचे गुणांमध्ये १३५% नी वाढ. कर्तव्य मेळावा-२०२४ मध्ये कोल्हापूर परिक्षेत्र संघास उपविजेता पद प्राप्त.
- देशातील सर्वोत्कृष्ट १० पोलीस ठाणे पैकी पुसेगाव पोलीस ठाणे, सातारा ची निवड. राज्यातील सर्वोत्कृष्ट पोलीस ठाणे मध्ये शिवाजीनगर पोलीस ठाणे व शिरोळ पोलीस ठाणे यांची निवड. ( सन २०२५ मध्ये पुरस्कार जाहीर )
- फेब्रुवारी २०२५ मध्ये ६८ व्या AIPDM स्पर्धा रांची, सातारा जिल्ह्यातील श्वान सुर्या याने Explosive शोधने या प्रकारामध्ये सुवर्ण पदक पटकावले. सन २०१४ नंतर महाराष्ट्र पोलीस दलास पदक प्राप्त.





महाराष्ट्र पोलीस
उत्कृष्ट पोलीस ठाणे पुरस्कार
२०२२

'प्रथम क्रमांक'
शिवाजीनगर पोलीस ठाणे,
कोल्हापूर जिल्हा

यांना गुन्हे उघड, निर्गती, दोषसिद्धी, प्रशासन, आस्थापना, जनसंपर्क, इत्यादी निकषांमध्ये वर्ष २०२२ या वर्षासाठी प्रथम क्रमांकाचा उत्कृष्ट पोलीस ठाणे पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक : ०१.०३.२०२५
ठिकाण : मुंबई

(रश्मि शुक्ला)
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई